नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०९/१२/२०२५ (मंगळवार )

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद ५० गोवंश जनावरांची सुटका, १ आरोपी अटक केळवद पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन केळवद** :— दिनांक ०८/१२/२०२५ रोजी केळवद पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मध्यप्रदेश राज्यातुन एन. एच. ४७ पाढंर्णा—नागपूर हायवे मार्गाने सावनेर दिशेने अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी भागेमाहेरी टोल नाका येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान एक एल. पी. ट्रेलर क्रमांक आर जे १४/जि ई ६६२३ येतांना दिसले. पोलीसांनी वाहन थांबविले असता वाहन चालक अंधाराचा फायदा घेत पळुन गेला. पोलीसांनी शिताफिने वाहनात बसलेल्या एका आरोपीला पकडले आणि त्याला नाव पत्ता विचारले असता त्याचे नाव अजरूद्दीन हुसैन बंजारा, वय २८ वर्ष, रा. ईस्लामपुर, तह. मालपुरा जि. टोक ( राजस्थान) असे सांगितले तसेच पळुन गेलेल्या इसमाचे नाव विचारले असता त्याने असम अली आसण अली, रा. कोटा, राजस्थान असे असल्याची माहीती प्राप्त झाली. पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ५० गोवंश जनावरे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अत्यंत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. **पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून १) एक एल. पी. ट्रेलर क्रमांक आर जे १४/जि ई ६६२३ किंमती ३५,००,०००/— रूपये २) एकुण ५० गोवंश जनावरे किंमती अंदाजे ६,३४,०००/—रुपये आणि एक मोबाईल असा एकुण ४१,४९,०००/— रूपयांचा मुददेमाल**

**जप्त केला आहे. सुटका केलेल्या जनावरांना निराश्रीत गौवंश फाउंडशेन, राहुळगाव, ता. काटोल येथे देखभाली करीता दाखल करण्यात आले आहे.**

नमुद प्रकरणी आरोपीतांविरूध्द कलम, २८१,३(५),४९ भा.न्या.सं सह कलम ११(१)(घ)(ड)(च) प्राण्यांना निर्दयतेने वागवणे प्रति. अधिनियम १९६० सहकलम ५(अ), ९ महाराष्ट्र प्राणी संरक्षन अधि. १९९५ सहकलम ११९ म.पो.का अन्वये गुन्हा नोंद करून **आरोपी नामे अजरूद्दीन हुसैन बंजारा याला अटक करण्यात आली आहे.**




## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## १० गोवंश जनावरांची सुटका, २ आरोपी अटक
## बुट्टीबोरी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन बुट्टीबोरी** :— दिनांक ०७/१२/२०२५ रोजी बुट्टीबोरी पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अशोक लेलॅड क्रमांक एम एच ४७ वाय २४५५ मध्ये अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी उमरेड ते बोरी जाणारे रोड वर उमरेड बायपास टी पॉईट, बोरी येथे नाकाबंदी

केली असता नाकाबंदी दरम्यान अशोक लेलॅंड क्रमांक एम एच ४७/वाय २४५५ येताना दिसले. पोलीसांनी वाहन थांबवुन तपासणी केली असता १. चालक नामे अविनाश पिराजी डिग्रसे, वय ३७ वर्षे, रा. पारडी खुर्द, ता. वसमत जि. हिंगोली २. क्लिनर नामे संतोश कचारू खाडे, वय ३१ वर्षे, रा. हट्टा, ता. वसमत, जि. हिंगोली हे मिळुन आले. त्यांना वाहन मालकाबाबत विचारना केली असता आरोपी क्रं ३) वाहन मालक नामे सय्यद कामरान सय्यद जावेद, वय ३२ वर्षे, हट्टा, ता वसमत जि. हिंगोली अशी माहीती पोलीसांना प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये १० गोवंश जनावरे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अत्यंत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. **पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून १) अशोक लेलॅंड कंपनीचे आयशर क्रमांक एम एच ४७ वाय २४५५ किंमती १५,००,०००/— रूपये २) एकुण १० गोवंश जनावरे किंमती अंदाजे २,१०,०००/—रुपये असा एकूण १७,१०,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.**

नमुद प्रकरणी आरोपीविरूध्द कलम ११(१) (ड) (ई) (अ) प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० सहकलम ५ (अ), ५ (४), ९ महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम सहकलम ४९, ३ (५) भा. न्या. सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **चालक आणि क्लिनर आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.**

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद
## ०५ जनावरांची सुटका, रामटेक पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन रामटेक** :— दिनांक ०८/१२/२०२५ रोजी रामटेक पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, रामटेक ते मनसर रोडनी एका महिन्द्रा कंपनीची पिकअप बोलेरो वाहन क्र. एम एच ३५ ए जे ४९०६ मध्ये अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा गवळण नाला रामटेक येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान पिकअप बोलेरो वाहन क्र. एम एच ३५ ए जे ४९०६ येताना दिसले. पोलीसांनी वाहन थांबवुन तपासणी केली असता चालक नामे— शुभम प्रल्हाद लांजेवार वय २३ वर्ष रा. भागवत टोला हनुमान मंदिर

जवळ ता. जि. गोंदीया हा मिळुन आला. पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ०२ म्हशी व ३ हेले असु एकुण ५ जनावरे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अत्यंत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून **१) महिद्रा कंपनीची पिकअप क्र.एम एच ३५/ए जे ४९०६ किंमती ४,००,०००/—रू २) ०५ जनावरे किंमती १,१०,०००/— रूपये असा एकुण किंमती ५१०,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.**

नुमद प्रकरणी आरोपीविरूध्द कलम ११(१) (ड) (फ) प्राणी छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## केबल चोरीच्या गुन्हयातील ३ पाहीजे आरोपी अटक , बुटीबोरी यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन बुटीबोरी** :— तक्रारदार नामे अवादा कंपनी तर्फे कंपनी सुपरवायजर किशोर गणपतराव मोहखाये वय ४० वर्षे रा. बुट्टीबोरी अंबिका बार चे मागे यांनी तक्रार दिली की, मौजा अवादा कंपनी परीसर बोरखेड, धवळपेठ येथे दिनांक ३०/०९/२०२५ ते १३/१०/२०२५ पर्यंत कंपनीतील आवारात ठेवलेला १४२७ मिटर केबल अंदाजे कि. ७०,०००/— रूपयांचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराटयांनी चोरी केल्याचे फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन बुटीबोरी येथे कलम ३०३(२) भारतीय न्याय संहीता अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

दिनांक २६/११/२०२५ रोजी सदर गुन्हयात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने आरोपी नामे १) प्रकाश भिखुजी मायकरकार,२) सुनील आकाश महाकाळकर, ३) नवसु गोपाळा महाजन, तिन्ही रा धवळपेठ, ४) संस्कार रामचंद्र बाहु, रा बिनाकी, मंगळवारी नागपुर, ५) चरणदास उत्तम काळे, रा बोरखेडी रेल्वे, ता. जि. नागपुर, ६) संस्कार रामचंद्र शाहु वय २१ वर्षे रा. बिनाकी मंगलवारी कांजीहाउस चौक, नागपुर यांना निष्पन्न केले होते. आरोपीतांना अटक करण्यात आली होती.

**नमुद गुन्हयात बुटीबोरी पोलीसांनी गुप्तबातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या अधारे दिनांक ०८/१२/२०२५ रोजी ७) अर्जुन मोरेश्वर गवते, वय. २७ वर्षे, रा.धवलपेठ, वार्ड क्र.२ ता.जि. नागपुर, ८) हनुमान उर्फ हन्या सुरेश काळे, वय. ३० वर्षे, रा. वार्ड क.२ , धवलपेठ ता.जि. नागपुर,९) सुभाष महादेव काकडे,वय ५३ वर्षे रा. वार्ड क.२, धवलपेठ ता.जि. नागपुर यांना ताब्यात घेवुन अटक केली आहे. पोलीसांनी सदर गुन्हयात ३ मोटर सायकल, गुन्हा करण्यासाठी वापरलेले वाहन टाटा एस क्रमांक एम.एच.३१ सि.क्यु. १२६६, चारचाकी वाहन क्र.एम.एच.४० सि.एच.०७२३ आणि चोरीस गेलेली केबल (तांबा धातुचे तार) असा एकुण ३,७९,००० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणारे तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०५ गुन्हे नोंद

दिनांक ०८/१२/२०२५ दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू काढणारे तसेच दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू, सडवा तसेच इतर साहीत्य असा एकुण २३२००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

पोलीस स्टेशन उमरेड येथे एकुण २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन नरखेड येथे एकुण २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन काटोल येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम अन्वये एकुण ०५ गुन्हे नोंद केले आहे.

**सदर कारवाईत ५० लीटर मोहाफुल दारू, ४०० लीटर सडवा तसेच इतर साहीत्य असा एकुण २३,२००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नाशवंत मुद्देमाल पंचानामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.**

# नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ६४८ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ०९/१२/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २१ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. एकुण ६४८ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुटिबोरी येथे २८ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३२ आरोपी अशा एकुण ९० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३७ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २३ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३५ आरोपी अशा एकुण १२३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे २६ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३७ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी अशा एकुण १२४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २७ आरोपी अशा एकुण ५९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३३ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३० आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २६ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २५ आरोपी अशा एकुण ११४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ४१ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ३८ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे २९ आरोपी अशा एकुण १३८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २१ पोलीस स्टेशन येथे एकुण ६४८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने